# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/नों.क्र.२१०९७०/२१/अ.क्र.५८०९/२४

श्री.विनोद मोहनलाल जैन

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी ई विभाग
सहाय्यक आयुक्त ई विभाग यांचे कार्यालय, १ ला मजला,
१० शेख हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४०० ००८.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त
सहाय्यक आयुक्त बृ.मुं.म.पा. ई विभाग यांचे कार्यालय,
१० शेख हाफिजुद्दीन मार्ग, भायखळा, मुंबई-४०० ००८.

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७-११-२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित. ट्रॅक रिपोर्टप्रमाणे नोटीस दि.०७-११-२०२४ रोजी प्राप्त झाली आहे. |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | अनुपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| १०-११-२०२० | २८-१२-२०२० | ०१-०२-२०२१ | -- |

अपिलकर्तांनी माहिती अर्ज दि.१०-११-२०२० नुसार महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेख अधिनियम २००५ अन्वये अभिलेख जतन व व्यवस्थापन बाबतच्या अभिलेख विभागणीच्या वर्गवारीची माहितीची मागणी केलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी ई विभाग यांनी दि.२८-१२-२०२० अन्वये अपिलकर्तांच्या माहिती अर्ज सहाय्यक आयुक्त ई विभागातील सर्व जन माहिती अधिकाऱ्यांना पाठवून अर्जदारास परस्पर माहिती देण्यास कळवून त्याची प्रत अपिलकर्तांना उपलब्ध करुन दिली.

प्रथम अपिलीय अधिकारींचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत.

जन माहिती अधिकारींच्या उत्तराने समाधान झाले नाही व प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी आदेश दिले नाही म्हणून अपिलकर्तांनी दि.०४-०३-२०२१ अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला.

आजच्या सुनावणीस अपिलकर्ता अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी आणि तत्कालिन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारींनी आयोगास सादर केले की, बृहन्मुंबई महानगरपालिका ई विभाग अंतर्गत १५ जन माहिती अधिकारी आहेत. प्रत्येक जन माहिती अधिकारींनी परस्पर अपिलकर्तास माहिती देण्याबाबत कळविले होते. १५ जन माहिती अधिकारींपैकी खालील जन माहिती अधिकारींनी अपिलकर्तांना कळविले आहे.

१. जन माहिती अधिकारी तथा मालमत्ता अधिकारी ई विभाग-II, III यांनी दि.२७-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.
२. जन माहिती अधिकारी तथा वसाहत अधिकारी ई विभाग यांनी दि.१९-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांनी मागणी केलेल्या माहिती अर्जातील मुद्दा क्र.१ बाबत माहिती दिली व मुद्दा क्र.२, ३ व ४ बाबत माहिती अभिलेखामध्ये आढळून आली नसल्याने पुरविता येत नाही असे कळविले.
३. जन माहिती अधिकारी तथा वरीष्ठ सुविधाकार ई विभाग यांनी दि.२५-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांनी मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध होईल असे उत्तर दिले.
४. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी (घ.क.व्य.) ई विभाग यांनी दि.२१-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.
५. जन माहिती अधिकारी तथा किटक नियंत्रण अधिकारी ई विभाग यांनी दि.२२-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.
६. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी ई विभाग (१) व (२) यांनी दि.१८-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.
७. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक करनिर्धारक व संकलक ई विभाग यांनी दि.२०-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.
८. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता जलकामे ई विभाग यांनी दि.०५-०१-२०२१ अन्वये अपिलकर्तांना विहीत शुल्क कळवून शुल्क भरल्यानंतर माहिती प्राप्त करुन घेण्यात यावी असे कळविले.
९. जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय आरोग्य अधिकारी ई विभाग सार्व.आरोग्य खाते यांनी दि.०४-०२-२०२१ अन्वये अपिलकर्तांना निरीक्षणसाठी येवून त्यांना हव्या असलेल्या माहितीचे शुल्क भरल्यानंतर माहिती देण्यात येईल असे कळविले.

अभिलेखावरुन दिसून येते की, अपिलकर्तांनी फार मोघम स्वरुपात १५ जन माहिती अधिकारी यांचेशी संबंधित एकाच माहिती अर्जाद्वारे माहिती विचारली होती. त्यांच्या माहितीचा विषय सुध्दा स्पष्ट नाही तरीही जन माहिती अधिकारींनी अभिलेख निरीक्षणाकरीता कळविले आहे.

क्र. मुमाआ/नों.क्र.२१०९७०/२१/अ.क्र.५८०९/२४



अपिलकर्तांनी यापुढे विषयाशी संबंधित जन माहिती अधिकारींना वेगवेगळे माहिती अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकाऱ्यांनी माहिती दिलेली आहे.

**आदेश**

**अपिल निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
7-11-2024

( डॉ.प्रदीप व्यास )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

State Information Commission Maharashtra

मुंबई
दिनांक : ०७-११-२०२४